**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, (टीआरटीआय), पुणे**

**२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे-४११००१**

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

Website- trti.maharashtra.gov.in

**सन २०२६-२७ करिता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत व आर्टी या संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांकरिता केंद्रीय सेवेमार्फत घेतल्या जाणाऱ्या (एसएससी) वर्ग -३ पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत....**

टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत व आर्टी या संस्थांमार्फत त्यांच्या लाभार्थी गटाच्या आर्थिक तसेच सामाजिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच सदर लाभार्थी गटातील युवक आणि युवतींकरीता विविध स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. सदर स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार उक्त संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्यातील पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी केंद्रीय सेवेमार्फत घेतल्या जाणाऱ्या (एसएससी) वर्ग -३ पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेकरिता स्पर्धा परिक्षा पूर्व मार्गदर्शन देऊन शासकिय नोकरीची संधी मिळावी म्हणून खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्याकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशिल, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ http://trti.maharashtra.gov.in ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवरुनच ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामयिक प्रवेश परिक्षा (Common Entrance Test - CET) व्दारे गुणांकन पध्दतीने करण्यात येणार आहे.

पात्र व इच्छुक उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, आरक्षण व सीईटीमधील प्राप्त गुणांनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती यांचेकडे राहतील.

- अर्ज करण्याचा सुरु दिनांक :- ९ /८ /२०२६
- अर्ज करण्याचा अंतिम दिनांक :-23/ ८/२०२६

(निलेश सागर, भा.प्र.से.)

**आयुक्त, टीआरटीआय पुणे**

**तथा अध्यक्ष,**

**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण**

**कार्यक्रम संनियंत्रण व अंमलबजावणी समिती**

Government of Maharashtra

# Tribal Research and Training Institute, (TRTI), Pune

28, Qeens Garden, Camp Pune-411001

(An Autonomous Institution of the Government of Maharashtra)

Website- trti.maharashtra.gov.in

***Online applications are invited from eligible and willing candidates of TRTI, BARTI, SARTHI, AMRUT, and ARTI across the State of Maharashtra for Coaching of Group 'C' posts under the Staff Selection Commission (SSC) examinations Preliminary Examination Programme (Non-Residential) for year 2026–27.***

**TRTI, BARTI, SARTHI, AMRUT and ARTI**, autonomous institutions of the Government of Maharashtra, implement various welfare schemes and competitive examination coaching programmes for the socio-economic development of their respective beneficiary groups.

In accordance with the Government of Maharashtra's comprehensive policy, online applications are invited from eligible and willing candidates of Maharashtra for Coaching to the Group 'C' posts under the Staff Selection Commission (SSC) Preliminary Examination Coaching Programme (Non-Residential) for the academic year 2026–27, conducted by SSC. The coaching will be imparted through reputed private professional coaching institutes to enhance candidates' prospects of securing Government employment.

Detailed information regarding the scheme, Government Resolution (GR), eligibility criteria, required documents is available on the official website **http://trti.maharashtra.gov.in**. Applications must be submitted online only through the prescribed link available on the website.

Selection of candidates shall be based on the merit of Common Entrance Test (CET). The decision of Competitive Examination Training Programme Monitoring and Implementation Committee regarding selection process will be final and binding.

- Application Start Date :- 9 / 8 /2026
- Application End Date:-23 / 8 /2026

(Nilesh Sagar, IAS.)

**Commissioner, TRTI Pune,**

**and Chairperson, (CETPMIC)**